**स.फौ.के. नं. २१४/२०२४**

**नि. क्र. ०६ लगत**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**नाव** – संजय हरीबा करांडे,

**वय** – ४१ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (पोलीस ह. ब. क्र. १५५१),

**सध्या नेमणूक** – पोलीस ठाणे देवरुख, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u> –**

**०१**. दिनांक २१/०७/२०२४ रोजी मी पोलीस ठाणे देवरुख अंतर्गत असलेल्या साखरपा पोलीस दूरक्षेत्र येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी पोलीस दुरक्षेत्र साखरपा येथे सकाळी ०८:०० ते रात्री ०८:०० वाजेपर्यंत माझे कर्तव्य होते. मी साखरपा पोलीस दुरक्षेत्र येथे कर्तव्यावर हजर असताना माझ्यासोबतचे पो.ह. ब.क्र. १०२७ श्री. जाधव यांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजे ओझरे बुद्रुक येथे विष्णू रामचंद्र कांबळे हा गावठी दारुचा अवैध व्यवसाय चालवितो.

**०२**. त्यावरुन मी, पो.ह. ब.क्र. १०२७ श्री. जाधव व पोलीस शिपाई चालक ब.क्र. ९४ नटे असे आम्ही हालचाल नोंदवहीला नोंद करुन छापा टाकणेकामी सरकारी वाहन क्र. एमएच–०८–एएक्स–७१०३ ने निघालो.

**०३**. आम्ही ओझरे बुद्रुक येथील बौध्दवाडी रस्त्याला एका बाजूला आमचे वाहन उभे केले. तेथे दोन इसमांना पंच म्हणून बोलावले. त्यांना छाप्याबाबत माहिती दिली. त्यानंतर पंच व आम्ही पोलीस असे आम्ही बौध्दवाडी ओझरे बुद्रुक येथे विष्णू रामचंद्र कांबळे यांच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्याने लक्ष ठेवून पायी निघालो. त्यावेळी, विष्णु कांबळे यांच्या घराशेजारी एक इसम त्याच्या पुढयात प्लॅस्टीकच्या ०२ बाटल्या व ०१ ग्लास घेवून बसलेला आम्हाला दिसला. आम्हाला त्याचा संशय आला. आम्ही त्याला जागीच रात्री ०८:०० वाजता धरले. आम्ही त्याच्याकडील बाबींची पाहणी केली असता त्याच्या ताब्यात प्रत्येकी ०२ लिटर मापाच्या ०२ बाटल्या व ०१ काचेचा पेला मिळून आला.

आम्ही त्या बाटल्यांची खात्री केली असता त्या गावठी दारुने भरलेल्या होत्या.

०४. आम्ही पंचांसमक्ष त्या इसमाला त्याचे नाव–गाव विचारले असता त्याने त्याचे नाव विष्णु रामचंद्र कांबळे, राहणार – ओझरे बुद्रुक, बौध्दवाडी, असे सांगितले.

०५. त्याठिकाणी पो.ह. ब.क्र. १०२७ श्री. जाधव यांनी पंचांसमक्ष १८० मिली क्षमतेच्या एका बाटलीत मिळून आलेल्या मुद्देमाल दारुपैकी काही दारु रासायनिक पृथःकरणाकरीता काढून घेतली. त्या नमूना बाटलीला व प्रत्येकी ०२ लिटरच्या त्या दोन्ही बाटल्यांना पंचांच्या व पोलीसांच्या सहयांचे लेबल चिकटविले. त्याठिकाणी मिळून आलेला मुद्देमाल ताब्यात घेतला. तेथे त्याबाबत पंचांसमक्ष पंचनामा केला.

०६. त्याठिकाणी पो.शि. श्री. नटे यांनी त्यांच्या मोबाईलद्वारे तेथे छायाचित्र काढले होते.

०७. त्यानंतर आम्ही मिळून आलेल्या मुद्देमालासह पोलीस दूरक्षेत्र साखरपा येथे परत आलो. तेथे आल्यावर मी आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली. त्यावरुन ऑकरन्स क्रमांक ७९/२०२४ नोंद करण्यात आला. मला आता दाखविणेत आलेला ऑकरन्स अहवाल तोच आहे. त्यावर माझी तसेच पोलीस दुरक्षेत्र अंमलदार पो.ह.ब.क्र. ५८ श्री. संदेश जाधव यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे (सदर **अहवालास निशाणी १४** देणेत आली). मला आता दाखविणेत आलेली फिर्याद तिच आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे (सदर **फिर्यादला निशाणी १५** देणेत आली).

०८. ज्या इसमाच्या ताब्यात मुद्देमाल मिळून आला त्या इसमाला पाहिल्यावर मी ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेकडून –**

०९. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी वाहनाच्या वापरासंबंधाने लॉकबूकमध्ये नोंदी कराव्या लागतात. कोणत्या ठिकाणाहून निघालो, कोठे गेलो, कशासाठी गेलो व

जाण्या–येण्याचे एकूण अंतर किती होते या बाबींचा उल्लेख लॉकबूकमध्ये असतो. किती वाजता निघालो व किती वाजता परत आलो या बाबींचा उल्लेख लॉकबूकमध्ये असतो अगर कसे याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस दुरक्षेत्र येथे कर्तव्यावर कोण आहेत याबाबतची नोंद डयुटी बटवडा रजिस्टरमध्ये असते.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, आम्ही पोलीस दुरक्षेत्र येथून किती वाजता निघालो होतो याबाबतची नोंद फिर्यादमध्ये नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादमध्ये पंचांची नावे नमूद केलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, बौध्दवाडी, ओझरे बुद्रुक येथे राहती लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, रासायनिक विश्लेषणाच्या अहवालाशिवाय एखादा द्रव प्रदार्थ दारुच आहे अगर कसे याबाबत निश्चीत सांगता येत नाही.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, आम्ही तेथे गेलेचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आरोपी मिळून आलेचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे ताब्यात मुद्देमाल मिळून आलेचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सॅम्पल घेतलेचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटीच फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2025.02.11 18:01:23 +0530

**(ब. द. तारे)**

**दिनांक –११.०२.२०२५** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 11/02/2025 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 11/02/2025 |
| Evidence uploaded on | : | 11/02/2025 |